# थोडक्यात पण महत्वाचे




## 'रोबोटिक जॉईंट रिप्लेसमेंट' सुविधेचा भव्य शुभारंभ

आळेफाटा (स. गांवकरी) : डॉ.सोनवणे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे 'रोबोटिक जॉईंट रिप्लेसमेंट' या सुविधेचा भव्य उद्घाटन समारंभ शनिवार दि. २० जून रोजी सायंकाळी ५ वाजता जुन्नर तालुक्याचे आमदार शरद सोनवणे, अस्थिरोग तज्ञ, साईनाथ हॉस्पिटल मोशी व नगरसेवक पिंपरी चिंचवड महानगरपालिका डॉ. सुहास कांबळे तर चेअर पर्सन, मेडिकल प्रॅक्टिशनर असोसिएशन जुन्नर तालुका चे डॉ. प्रदीप जोशी यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. उत्तर पुणे जिल्ह्या व बारा तालुक्यांमध्ये सर्वप्रथम सांधे प्रत्यारोपण करणारा रोबोट आळेफाटा येथे येत असल्याने रुग्णाची मोठी सोय होणार असून रुग्णांना आता पुणे, मुंबईला जाण्याची गरज नाही. 'रोबोटिक Assisted सर्जरी' मुळे कमीत कमी Incision मध्ये ऑपरेशन करता येते. तर कमीत कमी Bone Cut घ्यायला रोबोट मुळे मदत होते. पेशंटची Recovery फास्ट स्वरूपात होते. Conventional आणि जुन्या पद्धतीमुळे जसे दोन किंवा तीन महिने रुग्णांना रिकव्हर होण्यासाठी लागत होते तसे आता लागत नाहीत. आता रुग्णांना त्यांच्या रुटींग ॲक्टिव्हिटी साठी पंधरा दिवसांत जाता येते. ही सुविधा आळेफाटा येथे उपलब्ध होत असल्याने परिसरातून आनंद व्यक्त होत आहे. हेच निमंत्रण समजून कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन डॉ. सोनवणे हॉस्पिटल परिवाराच्यावतीने जनाबाई & रोहिदास सोनवणे, डॉ. शिवाजी सोनवणे, डॉ. स्मिता सोनवणे यांनी केले आहे. स्थळ:- डॉ.सोनवणे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, नाशिक रोड आळेफाटा, ता. जुन्नर, जि. पुणे.

## प्रा. डॉ. विरेंद्र शेटे यांची आयईटीईच्या गव्हर्निंग कौन्सिलवर निवड



पुणे (स. गांवकरी) : एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी (एडीटी) विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. विरेंद्र शेटे यांची इन्स्टिट्यूशन ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअर्स (आईटीई), नवी दिल्लीच्या २०२६–२०२९ या कार्यकाळासाठी गव्हर्निंग कौन्सिल सदस्य म्हणून निवड झाली आहे. विशेष म्हणजे, महाराष्ट्रातून या सर्वोच्च राष्ट्रीय संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिलवर निवड झालेले ते केवळ दोन प्रतिनिधींपैकी एक आहेत. शिक्षण, संशोधन, प्रशासकीय नेतृत्व आणि संस्थात्मक विकास क्षेत्रातील ३२ वर्षांहून अधिक अनुभव असलेल्या प्रा. डॉ. शेटे यांनी उच्च शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांनी १५० हून अधिक संशोधन निबंध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नियतकालिके व परिषदांमध्ये प्रकाशित केले असून, त्यांच्या नावावर तीन पेटंट्स, पाच कॉपीराइट्स आणि तीन पुस्तके आहेत.



## अरणगाव दु. येथील जिल्हा परिषद शाळेत पाठ्यपुस्तक व गणवेश वाटप

■ नवागत विद्यार्थ्यांचे बैलगाडीतून स्वागत

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : श्रीगोंदा तालुक्यातील अरणगाव दु. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी नवागत विद्यार्थ्यांचे अनोख्या पद्धतीने स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांची बैलगाडीतून गावातून मिरवणूक काढत त्यांना शाळेत प्रवेश देण्यात आला. या उपक्रमामुळे गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच मोहनराव आढाव होते. यावेळी नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. तसेच सरपंच मोहनराव आढाव यांच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना शालेय पाठ्यपुस्तके व गणवेशांचे वितरण करण्यात आले. सातववाडी, लभडे वस्ती तसेच मिरावली माध्यमिक विद्यालय येथेही नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा पुष्पा आढाव यांच्यासह राधू आढाव, सुभाष कुटे, दादासाहेब रणदिवे, प्रकाश आढाव, राजू शिंदे, निर्मला चव्हाण, रूपाली कुताळ, बापू सातव, लक्ष्मी रणदिवे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अरणगाव दुमाला येथील मुख्याध्यापिका सुवर्णलता गायकवाड, पदवीधर शिक्षक प्रभाकर राजापुरे, उपाध्यापक अर्जुन राऊत, कविता म्हस्के, मिरावली विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी उदार तसेच बैलगाडी उपलब्ध करून देणारे शिवनाथ कुताळ उपस्थित होते. याशिवाय शिक्षक, ग्रामस्थ आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवागत विद्यार्थ्यांचे आनंददायी स्वागत, शैक्षणिक साहित्याचे वितरण आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आकर्षण निर्माण झाले असून शिक्षणाबाबत सकारात्मक वातावरण तयार झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## बेजबाबदार कारभाराविरोधात कांतीराम बोहाडे पाटील आक्रमक!



राजगुरूनगर (स. गांवकरी) : शासकीय कार्यालयांमध्ये येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना नियमांचे पालन करण्यास भाग पाडले जाते, मात्र अनेक अधिकारी व कर्मचारी स्वतःच सेवा शिस्तीच्या नियमांचे उल्लंघन करत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार कांतीराम बोहाडे पाटील यांनी केला आहे. कार्यालयात ओळखपत्र व नामफलक न लावणे, वेळेवर उपस्थित न राहणे आणि नागरिकांना विनाकारण हेलपाटे मारायला लावणे या प्रकारांविरोधात त्यांनी मुख्याधिकारी व विभागप्रमुखांना लेखी निवेदन सादर केले. निवेदनात महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ आणि माहितीचा अधिकार अधिनियम २००५ यांचा उल्लेख करून प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे. सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी ओळखपत्र व नामफलक लावणे बंधनकारक करावे, वेळपालनावर नियमित देखरेख ठेवावी तसेच नागरिकांची अडवणूक करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. "नागरिकांसाठी एक नियम आणि शासकीय कर्मचाऱ्यांसाठी दुसरा नियम चालणार नाही," असे स्पष्ट करत योग्य कारवाई न झाल्यास सक्षम प्राधिकरणाकडे तक्रार, कायदेशीर नोटीस आणि पुढील आंदोलनाचा इशारा कांतीराम बोहाडे पाटील यांनी दिला. यावेळी प्रिंट व डिजिटल मीडिया पत्रकार संघ, खेड तालुक्याचे पदाधिकारी, सचिन भंडारी, शोभा गावडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# नाशिक–पुणे सरळ रेल्वेमार्ग रद्द

### उत्तर महाराष्ट्राच्या विकासावर घाला, आमदार सत्यजीत तांबे आक्रमक!

■ "रेल्वे मंत्रालयाच्या निर्णयाविरोधात तीव्र निषेध

■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने हस्तक्षेप करावा, अन्यथा जनआंदोलन उभारणार"



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

नाशिक-पुणे सरळ रेल्वेमार्ग रद्द करण्याच्या निर्णयावर आमदार सत्यजीत तांबे यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या भूमिकेवर कठोर शब्दांत टीका केली आहे. सरकारने विकास प्रकल्पांचा विचार करताना केवळ आर्थिक नफा-तोट्याचा विचार न करता जनतेचे हित आणि भावी पिढ्यांचा विकास हेच प्राधान्य ठेवले पाहिजे, असे त्यांनी म्हटले आहे. नाशिक-सिन्नर-संगमनेर-अकोले-नारायणगाव-राजगुरुनगर-चाकण मार्गे प्रस्तावित असलेला नाशिक-पुणे सरळ रेल्वेमार्ग रद्द केल्याने नाशिक, अहिल्यानगर, पुणे जिल्ह्यासह संपूर्ण उत्तर महाराष्ट्राच्या विकासाला मोठा धक्का बसणार असल्याचे तांबे यांनी सांगितले. हा निर्णय असंवेदनशील असून त्याचा आपण जाहीर आणि तीव्र निषेध करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच्या अर्थसंकल्पात या विषयासाठी तज्ज्ञ समिती स्थापन करून मार्ग काढण्याचे आश्वासन दिले होते. त्यामुळे त्यांनी या प्रश्नात तातडीने लक्ष घालून हा प्रकल्प रद्द होऊ न देण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणीही तांबे यांनी केली.

हा प्रश्न सोडविण्याची क्षमता मुख्यमंत्र्यांकडेच असल्याचा विश्वास सामान्य जनतेला असल्याचे त्यांनी नमूद केले. यापूर्वी मुख्यमंत्री शिर्डी दौऱ्यावर आले असताना त्यांच्याशी या विषयावर सविस्तर चर्चा झाल्याचेही तांबे यांनी सांगितले. त्यावेळी नाशिक-शिर्डी रेल्वेमार्ग पूर्ण झाल्यास मुंबई ते शिर्डी प्रवासाचा वेळ सुमारे ५० मिनिटांनी कमी होऊ शकतो, असे मत मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केले होते. तसेच या मार्गावर इंडियाबुल्स कंपनीने सुमारे ५० टक्के काम पूर्ण केले असून तुलनेने कमी खर्चात हा प्रकल्प पूर्ण होऊ शकतो, यावरही चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले.

अहिल्यानगर ते पुणे रेल्वेमार्ग दौंडऐवजी सरळमार्गे व्हावा, अशी आपली सन २०११-१२ पासून मागणी असल्याचे आमदार तांबे यांनी नमूद केले. हा प्रकल्प दोन दशकांपूर्वीच पूर्ण झाला असता तर भूसंपादन आणि प्रकल्पाचा खर्च मोठ्या प्रमाणात कमी झाला असता तसेच जनतेचाही पैसा वाचला असता, असे ते म्हणाले.

> आज नाशिकहून पुण्याला रस्त्याने जाण्यास साडेचार ते पाच तास लागतात. मात्र सरळ रेल्वेमार्ग झाल्यास हे अंतर अवघ्या पावणेदोन तासांत पार करता येऊ शकते. त्यामुळे या प्रकल्पाकडे केवळ आर्थिक दृष्टिकोनातून न पाहता जनतेच्या हिताच्या दृष्टीने विचार करणे आवश्यक आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. सरकारने आधीच या प्रकल्पाला विलंब लावून जनतेच्या अपेक्षांवर पाणी फेरले आहे. आता प्रकल्प रद्द करण्याचा निर्णय घेऊन जनतेच्या भविष्यासमोर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. या निर्णयाविरोधात जनतेचा आक्रोश अधिक तीव्र होईल आणि सरकारला त्याला सामोरे जावे लागेल, असा इशाराही आमदार सत्यजित तांबे यांनी दिला.

## 'इंडियाज प्राईड अवॉर्ड २०२६'साठी संपादक डॉ. किशोर पाटील यांची निवड!

मुंबई : (स. गांवकरी)




भारतीय चित्रपट, कला, साहित्य, सामाजिक, शैक्षणिक सांस्कृतिक,ज्येष्ठ पत्रकार व विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या 'इंडियाज प्राईड अवॉर्ड २०२६' या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी दै. स्वराज्य तोरणचे संपादक डॉ. श्री. किशोर बळीराम पाटील यांची निवड करण्यात आली आहे. मुंबईस्थित भारतीय सिनेयुग प्रॉडक्शन अँड अकॅडमी (Bhartiya Cineyug Production and Academy) यांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या या पुरस्कार सोहळ्याचे हे तिसरे पर्व (सीझन-३) आहे. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणारे कर्तृत्ववान व्यक्ती, विक्रमवीर आणि समाजहितासाठी योगदान देणाऱ्या मान्यवरांचा या सोहळ्यात सन्मान करण्यात येणार आहे. आयोजक संस्थेकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या नामांकन पत्रानुसार, डॉ. किशोर बळीराम पाटील यांची पत्रकारिता, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाची दखल घेऊन त्यांना या पुरस्कारासाठी नामांकित करण्यात आले आहे. त्यांच्या निवडीमुळे पत्रकारिता क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे. शुक्रवार दिनांक २६ जून २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता मुंबई येथील अंधेरी पश्चिम, जुहू लेन परिसरातील मेयर्स ऑडिटोरियममध्ये आयोजित करण्यात आले असल्याची माहिती आयोजक अनिल शिंपी यांनी दै.स्वराज्य तोरणशी बोलतांना दिली.

## पुणे- नाशिक रेल्वे मार्ग सरळ होणे अत्यंत गरजेचे

### माजी मंत्री बाळासाहेब थोरात : पिढ्यानपिढ्याच्या समृद्धी करता राजकारण विरहित हा मार्ग सरळ व्हावा

संगमनेर : (स. गांवकरी)



मुंबई-नाशिक- पुणे हा गोल्डन ट्रँगल असून नाशिक पुणे सरळ रेल्वे करता आपण सातत्याने पाठपुरावा केला. यासाठी सर्व काम पूर्ण होऊन भूसंपादनाचे सुमारे 500 कोटींपेक्षा जास्त रक्कमही शेतकऱ्यांना देण्यात आली. आता मात्र वेगळी कारणे सांगितली जात आहेत. केंद्रीय रेल्वेमंत्र्यांनी या मार्गाबाबत केलेले विधान हे अत्यंत दुर्दैवी असून या विभागाच्या विकासाकरता नाशिक पुणे रेल्वे ही सरळ मार्ग होणे अत्यंत गरजेचे असल्याचे प्रतिपादन कॉंग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते मा.महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले असून भविष्यातील अनेक पिढ्यांसाठी राजकारण विरहित आपल्या सर्वांना सरळ रेल्वे मार्गासाठीच आग्रह धरावा लागणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नाशिक पुणे सरळ रेल्वे मार्ग रद्द केल्याचे विधान नुकतेच केले आहे. यामुळे उत्तर महाराष्ट्रात सह पुणे जिल्ह्यातील उत्तर भागांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला आहे. यावर प्रतिक्रिया देताना कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा मा महसूल मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, नाशिक पुणे रेल्वे बाबत केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केलेले वक्तव्य या विभागासाठी आणि संपूर्ण महाराष्ट्रासाठी अत्यंत दुर्दैवी आहे.

> नाशिक पुणे रेल्वे मार्ग रद्द करून शिर्डी अहिल्यानगर मार्गे नवीन नेण्याबाबत झालेल्या घोषणेनंतर नाशिक सिन्नर संगमनेर जुन्नर नारायणगाव खेड मंचर यांसह उत्तर महाराष्ट्र व पुणे जिल्हा यामधील विविध तालुक्यांमधील नागरिकांमध्ये व विशेषता तरुणांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे.

मुंबई नाशिक पुणे हा गोल्डन ट्रँगल म्हणून ओळखला जातो. विकासाच्या दृष्टीने हा गोल्डन ट्रँगल देशाच्या आणि महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. याकरता नाशिक पुणे रेल्वे होणे हे अत्यंत गरजेचे आहे. याकरता आपण सातत्याने पाठपुरावा केला. त्या दृष्टीने कामही झाले. रेल्वेसाठी जमिनी भूसंपादित करून सुमारे 500 कोटींपेक्षा जास्त रक्कम ही देण्यात आली. असे सगळे झाले असताना आता मात्र जीएमआरटी आणि अन्य गोष्टी सांगितल्या जात आहेत. यावरून हा रेल्वे मार्ग रद्द केल्याचे सांगितले जात आहे .हे अत्यंत दुर्दैवी आहे. नवीन मार्गदर्शक सुचवला आहे त्या मार्गातून उपलब्धी काय किंवा त्याचा फायदा काय असे विचारले असता तर काहीही दाखवता येणार नाही. म्हणून नाशिक पुणे रेल्वे ही सरळ मार्गे झाली पाहिजे यासाठी आपल्या सगळ्यांना आग्रह धरावा लागणार आहे. हा विषय निवड आजच्या राजकारणाचा नाही किंवा कोणत्याही राजकारणी व्यक्तीचा नाही. राजकारणा पलीकडे जाऊन विकासाच्या वाटचालीसाठी सरळ रेल्वे अत्यंत महत्त्वाची आहे. पिढ्यानपिढ्याच्या भविष्यासाठी आणि या विभागाच्या समृद्धीसाठी गोल्डन ट्रँगल जोडणारा हा सरळ रेल्वे मार्ग झाला पाहिजे.

## पारनेर तहसील आणि पोलीस ठाणे परिसरात बेशिस्त वाहनांचा विळखा

पारनेर : (स. गांवकरी)



तालुक्यातील प्रशासनाचा कणा मानल्या जाणाऱ्या पारनेर तहसील कार्यालय आणि पोलीस ठाणे परिसरातच वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवले जात आहेत. या दोन्ही महत्त्वाच्या कार्यालयांच्या आवारात बेशिस्त नागरिकांनी अवैधपणे वाहने उभी केल्याने सर्वसामान्य नागरिकांना दररोज मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे.

एकीकडे पोलीस प्रशासन शहरात कारवाईचा बडगा उगारत असताना, शासकीय कार्यालयांच्या दारात होणाऱ्या या अतिक्रमणाकडे मात्र प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

पारनेर तहसील कार्यालय आणि पोलीस ठाण्यात कामानिमित्त तालुक्यातील कानाकोपऱ्यातून शेकडो नागरिक येत असतात. मात्र, या कार्यालयांच्या प्रवेशद्वारावर आणि परिसरातच चारचाकी व दुचाकी वाहनांची मोठी गर्दी असते. यामुळे पायी चालणेही कठीण झाले असून, नागरिकांना आपल्या कामासाठी कार्यालयात पोहोचताना तारेवरची कसरत करावी लागते.

विशेष म्हणजे, पोलीस प्रशासन आणि वाहतूक शाखेकडून पारनेर बसस्थानक परिसर तसेच सुपा रोडवर बेशिस्त वाहनचालकांवर धडाकेबाज कारवाया केल्या जातात. तेथे ऑनलाईन दंड आकारला जातो.

मात्र, हीच शिस्त पोलीस ठाणे आणि तहसील कार्यालयाच्या आवारात का पाळली जात नाही? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. शासकीय कार्यालयांच्या आवारात बिनदिक्कतपणे उभ्या असणाऱ्या वाहनांवर कोणतीही कारवाई होत नसल्याने, हा 'दुजाभाव' का, अशी चर्चा सर्वसामान्यांमध्ये रंगली आहे.

शासकीय कार्यालयांच्या समोरच वाहनांचा असा विळखा पडल्याने आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिकेला किंवा इतर महत्त्वाच्या वाहनांना मार्ग काढणे कठीण होत आहे. प्रशासकीय अधिकारी आणि पोलीस प्रशासनाने वेळीच याकडे लक्ष देऊन, तहसील व पोलीस ठाणे परिसर 'नो पार्किंग' झोन करावा आणि नियम तोडणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी नागरिक करत आहेत.

जर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या शासकीय कार्यालयांच्या आवारातच नियमांचे उल्लंघन होत असेल, तर कायदा व सुव्यवस्थेचा संदेश काय जाणार? असा सवाल आता जागरूक नागरिक विचारत आहेत.

## जिल्हा परिषद ठाणे प्रशासनाची प्रभावी उपाययोजना

ठाणे : (स. गांवकरी)

■ ५१ गावे व १५२ वाड्यांतील १ लाख १० हजारांहून अधिक नागरिकांना ४८ टँकरद्वारे पाणीपुरवठा

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी जिल्हा परिषद ठाणे प्रशासनाने प्रभावी नियोजन करत टंचाईग्रस्त भागांमध्ये नियमित टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू ठेवला आहे. आजच्या, दि. १५ जून, २०२६ अखेरच्या अहवालानुसार जिल्ह्यातील ५१ गावे आणि १५२ वाड्यांमधील एकूण १ लाख १० हजार १०९ नागरिकांना ४८ खाजगी टँकरच्या माध्यमातून पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले जात आहे. ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत पाणीटंचाईग्रस्त भागांचा सातत्याने आढावा घेऊन आवश्यकतेनुसार तात्काळ उपाययोजना राबविण्यात येत आहेत. नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी प्रशासनाने वेळोवेळी पाठपुरावा करून टँकर उपलब्ध करून दिले असून संबंधित यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यात सर्वाधिक पाणीटंचाई शहापूर तालुक्यात असून येथे ४० गावे व १३९ वाड्यांतील ९८ हजार ९१८ नागरिकांसाठी ४४ खाजगी टँकरद्वारे नियमित पाणीपुरवठा सुरू आहे. दुर्गम व आदिवासी भागांपर्यंतही पाणी वेळेत पोहोचावे यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. मुरबाड तालुक्यात ८ गावे व ११ वाड्यांतील ७ हजार ८६६ नागरिकांसाठी ३ खाजगी टँकर कार्यरत आहेत, तर अंबरनाथ तालुक्यातील ३ गावे व २ वाड्यांतील ३ हजार ३२५ नागरिकांना १ टँकरच्या माध्यमातून पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले जात आहे.

# टाकळी ढोकेश्वर उपबाजार समितीचा वनवास संपेना

### नव्या जागेच्या मोजणीवरून ग्रामस्थांचा कडाडून विरोध : बाजारपेठ वाढवण्यासाठी सभापती बेलकर सरसावले, तर जुन्या जागांच्या घोटाळ्यावरून स्थानिकांचे प्रश्नचिन्ह

पारनेर : (स. गांवकरी)



पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या टाकळी ढोकेश्वर येथील उपबाजाराचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून रखडला असून, आता एका नव्या वादाला तोंड फुटले आहे. टाकळी ढोकेश्वर येथील गट नंबर ९६२ मधील गायरान जमिनीपैकी ५ एकर जागा उपबाजार समितीसाठी उपलब्ध करून देण्याच्या हालचाली शासन पातळीवर सुरू झाल्या आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार बुधवारी भूमिअभिलेख कार्यालयाकडून या जागेची मोजणी पूर्ण करण्यात आली. मात्र, या मोजणीला स्थानिक ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शविल्यामुळे, सौर ऊर्जा प्रकल्पापाठोपाठ आता ही ५ एकर जागाही वादाच्या भोवऱ्यात सापडण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. टाकळी ढोकेश्वर येथील शासकीय गायरान क्षेत्रात एकूण २३ एकर जागा शिल्लक असल्याची माहिती आहे. या जागेवर उपबाजार समिती उभारण्यासाठी ५ जून २०२३ रोजी बाजार समितीच्या वतीने एकमताने ठराव मंजूर करण्यात आला होता . हा प्रस्ताव पणन महामंडळाकडे पाठवल्यानंतर, संबंधित विभागाच्या परवानग्या घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयाने भूमिअभिलेख विभागाला मोजणीचे आदेश दिले होते. त्यानुसार बुधवारी मोजणी प्रक्रिया पार पडली.

परंतु, या प्रक्रियेला ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय निवडुंगे, अंकुश पायमोडे, मळीभाऊ रांधवन, संकेत झावरे, बबलु झावरे, अशोक पायमोडे, किसन धुमाळ या लोकप्रतिनिधींसह स्थानिक ग्रामस्थांनी कडाडून विरोध केला आहे . गेल्या २० ते २५ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या उपबाजार समितीला जागा मिळवताना पुन्हा एकदा स्थानिक ग्रामस्थांच्या 'अग्निपरीक्षेला' सामोरे जावे लागणार असल्याचे चित्र दिसत आहे.

टाकळी ढोकेश्वर उपबाजार समितीची साडेसाती संपायला तयार नाही, अशीच सध्याची स्थिती आहे. वास्तविक पाहता, नगर-कल्याण महामार्गावर उपबाजार समितीची गट नंबर १६४ मध्ये अडीच एकर हक्काची जागा उपलब्ध आहे. मात्र, या जागेला जाण्यासाठी रस्ताच नसल्याने ती जागा आधीच वादाच्या भोवऱ्यात अडकली आहे. "रस्ता नसताना ही जागा बाजार समितीने घेतलीच कशी?" असा गंभीर प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

एकीकडे कोट्यवधींची हक्काची जागा कायदेशीर कचाट्यात आणि विक्रीच्या वादात अडकलेली असताना, दुसरीकडे नवीन गायरान जमिनीच्या मोजणीला ग्रामस्थांनी विरोध केल्यामुळे टाकळी ढोकेश्वर उपबाजार समितीचा वनवास संपणार कधी, हा प्रश्न कायम आहे.

टाकळी ढोकेश्वर येथील मुख्य वासुंदा चौकातील गट नंबर ८४२/१ मधील कोट्यवधी रुपये किमतीची जागा तत्कालीन संचालक मंडळाने प्रशासक राजवटीच्या काळात परस्पर विकल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे.

आज या जागेवर दोन-तीन मजली इमारती आणि आलिशान बंगले उभे राहिले आहेत. या संदर्भातील न्यायालयीन लढाईत बाजार समितीने माघार घेतल्यामुळे समितीला आपली हक्काची जागा गमवावी लागली आहे.

स्वतःची मोक्याची जागा गमावल्यामुळेच आता बाजार समितीवर नवीन जागा शोधण्याची वेळ आली आहे.